ISSN 2278-8158
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# ROYAL

Volume - XII Issue - II December - May - 2023-24

English/Marathi Part - I

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47037

Single Blind Review / Double Blind Review

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2023 - 6.701
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **“ROYAL”**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Published by**

Ajanta Prakashan, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877 Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta3535@gmail.com, www.ajantaprakashan.in

**ROYAL - ISSN 2278 - 8158 - Impact Factor - 6.701 (www.sjifactor.com)**

# EDITORIAL BOARD


**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental Sciences,
Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar University
Raebareily Road, Lucknow.

**Dr. P. A. Koli**
Professor and Head (Retdf.),
Dept. of Economics, Shivaji University, Kolhapur.

**Dr. Kishore Kumar C. K.**
Coordinator Dept. of P. G. Studies and Research in
Physical Education and Deputy Director of
Physical Education, Mangalore University, Mangalore.

**Dr. Sadique Razaque**
University Dept. of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head, Dept. of Psychology,
University of Madras.

**Dr. Pramod L. Chavan**
Head Dept. of History
Jaikanti Arts and Commerce Senior College,
Latur (Maharashtra)

**Dr. Mirza Imran Baig**
Assistant Professor, Department of B.B.A.
(Computer Application) Poona College of Arts,
Science & Commerce, Camp, Pune-1

**Dr. Mamta Nanakchand Panjabi**
Department of Hindi,
Smt. V. U. Patil Art's & Late. Dr. B. S. Desale
Sci. College Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule. (M.S.)

**Dr. Rushikesh B. Kamble**
H.O.D. Marathi S. B. College of Arts and
Commerce, Aurangpura, Aurangabad. (M.S.)

**Dr. Suresh B. Bijawe**
Department of English,
Bharatiya Mahavidyalaya,
Morshi, Dist. Amravati. (M.S.)

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Manerao Dnyaneshwar Abhimanji**
Asst. Prof. Marathwada College of Education,
Dr. Rafique Zakaria Campus, Aurangabad.

**Dr. Ambuja N. Malkhedkar**
Department of Hindi, Shree Vidya Science and
Commerce Womens Degree College,
Kalaburagi, Karnataka.

**Dr. Ranjita Roy Sarkar**
Assistant Professor, Department Of Geography,
Kalipada Ghosh Tarai Mahavidyalaya, Bagdogra.

**Dr. Ganesh S. Chandanshive**
Asst. Prof. & Head of Dept. in Lokkala Academy,
University of Mumbai, Mumbai.

# EDITORIAL BOARD

**Dr. Uttam Panchal**
Vice Principal, Dept. of Commerce and Management Science,
Deogiri College, Aurangabad.

**Dr. S. K. Goyal**
Professor & Head Department of Public Administration,
S. N. Govt. P. G. College, Khandwa,
Indira Chowk, Khandwa. (M.P.)

**Dr. Harish Kumar**
Associate Professor, Noida College of Physical Education, Doom Manikpur Dadri. (U.P)

**PUBLISHED BY**

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF ENGLISH PART - I


| Sr. No. | Name & Author Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | A Study on Consumer Perception towards Food Delivery Applications in Surat City<br>**Dr. Hurmaz Patel** | 1-5 |
| 2 | Depiction of Indian Women in Manju Kapur's Difficult *Daughters* : A Critical Study<br>**Dr. S. T. Haibatpure** | 6-10 |
| 3 | Emergence of "Changed Woman" In Madhuri Banerjee's Advantage<br>**Dr. Mohan Padmakar Joshi** | 11-15 |
| 4 | Evaluating Digital Education Strategies in India Amidst COVID-19: A Study of Effectiveness and Limitations<br>**Dr. Prakash Narayan Tiwari**<br>**Dr. Prabhat Kumar Singh** | 16-22 |
| 5 | The Pursuit of Health and Fitness: Exploring the Intersection of Sports and Well-being<br>**Vijayakumar T. Bikkannavar** | 23-26 |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतीय संविधान महिला हक्क, अधिकार आणि कायदे<br>**प्रा.संजय अंकुशराव जगताप** | १-५ |
| २ | समता या संकल्पनेचा चिकित्सक : अभ्यास<br>**डॉ. बंडू थावरा पवार** | ६-९ |
| ३ | माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या दुपारच्या सत्रातील अनुपस्थितीच्या कारणांचा शोध - एक अभ्यास<br>**डॉ. शिवनंदा उमाजीराव मेहेत्रे** | १०-१३ |
| ४ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज व डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आरक्षणविषयक विचार<br>**डॉ. प्रताप वामनराव पाटील** | १४-२० |
| ५ | मराठी आदिवासी कवितेतील प्रतिमा<br>**डॉ. विजयकुमार शिवदास ढोले** | २१-२५ |
| ६ | हिंदुस्थानी संगीत मराठवाड्यातील ऐतिहासिक संदर्भ: (मध्ययुगीन कालखंड)<br>**डॉ. सुरेख रत्नपारखी** | २६-२९ |
| ७ | भारतीय सण-उत्सव साजरे करण्याची पध्दती आणि त्यातुन होणारे प्रदुषण रोखण्यासाठी युवकांची भूमिका संदर्भ: बीड शहर<br>**डॉ. सुनंदा एकनाथराव आहेर** | ३०-३९ |
| ८ | राजश्री शाहू महाराज व बाबासाहेब आंबेडकर यांचे शोषित वर्गाच्या विकासात योगदान<br>**संध्या आसाराम पगारे**<br>**प्रा. डॉ. सुभाष प्रभू राठोड** | ४०-४५ |
| ९ | पश्चिम विदर्भातील मुद्रा कर्ज योजनेमुळे लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीमधिल झालेल्या बदलाचे अध्ययन<br>**हरिदास प्रतापसिंग सोळंके**<br>**प्राचार्य डॉ. रामेश्वर मा. भिसे** | ४६-४९ |
| १० | प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचे अमरावती जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी चिकित्सक अवलोकन<br>**कु. मनिषा मधुकर ढोके**<br>**प्रा. डॉ. दयाळू किसन राठोड** | ५०-५३ |
| ११ | भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांची उत्क्रांती आणि विकास<br>**प्रा. शैलेश सुदाम हातबुडे** | ५४-५८ |
| १२ | . लोकसाहित्यातील वाङ्मयीन सौंदर्य : एक आस्वाद<br>**प्रा. डॉ. विनोद उत्तमराव भालेराव** | ५९-६४ |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | संत नामदेवाच्या अभगांतील 'लोकतत्व'<br>**डॉ. सुखदेव बा. पोटदुखे** | ६५-६८ |
| १४ | स्वसंवादाची शक्ती आंतरीक संवाद सुधारण्याची एक कला<br>**डॉ. निळकंठ वडजे**<br>**सचिन विठ्ठल राठोड** | ६९-७० |
| १५ | औरंगाबाद जिल्ह्यातील पर्यटनाचा विकास आणि रोजगाराच्या संधी : एक अभ्यास<br>**जावळे तक्षशिला बळीराम**<br>**प्रा. डॉ. विश्वास गुलाबसिंग शिंदे** | ७१-७५ |
| १६ | संत साहित्याची भूमिका<br>**डॉ. अतुल पाटील** | ७६-८० |
| १७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मपरिवर्तनासाठी वापरण्यात आलेली जनसंवादाची साधने<br>**उदय देवराम गायकवाड** | ८१-८६ |
| १८ | बंजारा समाज  पारंपारिकता आणि आधुनिकता<br>**श्री. वैजनाथ मेघराज राठोड**<br>**प्रा. डॉ. सौ. संपदा कुलकर्णी** | ८७-८९ |
| १९ | अस्पृश्यांच्या धर्माची कारणमीमांसा : ऐतिहासिक अध्ययन<br>**प्रा. डॉ. नरवाडे जे. एम.** | ९०-९२ |
| २० | आधुनिकिकरणाची प्रक्रिया आणि तमाशा कला व कलांवत : सामाजिक बहिष्काराचा इतिहास<br>**डॉ. बाळासाहेब बी. पवार**<br>**डॉ. नागेश त्रि. शेळके** | ९३-९८ |
| २१ | आधुनिक युगातील स्त्रीवादी साहित्याची वाटचाल<br>**सौ. अंजली शशिकांत गोडसे** | ९९-१०३ |
| २२ | भारताचे नवीन शैक्षणिक धोरण २०२० : एक आढावा<br>**डॉ. भगवान सांगळे** | १०४-१०७ |
| २३ | दलित साहित्याचे मनोविश्लेषनात्मक चिंतन<br>**डॉ. अशोक डोळस** | १०८-१११ |
| २४ | रत्नागिरी तालुक्यासाठी आदर्श ग्राम प्रतिमान : महिलांची भूमिका<br>**प्रा. तुळशीदास ब. रोकडे** | ११२-१२१ |
| २५ | ज्ञानसंरचनावाद स्वरुप व प्रकार<br>**डॉ. सीमा प्रकाश परदेशी** | १२२-१२६ |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २६ | सातारा जिल्ह्यातील कृषीपूरक उद्योगधंदे एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप<br>**प्रा. अरूण सदाशिव कटकोळे** | १२७-१३३ |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे - ४११००७
**Savitribai Phule Pune University**
Ganeshkhind, Pune – 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११५६/५७/६०
Telephone : 020-25621156/57/60
ईमेल / Email : boards@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
Academic Section (Approval Cell)
वेबसाईट / Website: www.unipune.ac.in

## परिपत्रक क्र.२२४/२०२२

विषय:— शिक्षकांची नियुक्ती, सेवांतर्गत पदोन्नती, मार्गदर्शक मान्यता इत्यादीसाठी शोधनिबंध (Research Paper) ग्राह्य धरणेबाबत.

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शिक्षकांची नियुक्ती, सेवांतर्गत पदोन्नती (CAS) संशोधन मार्गदर्शक मान्यता (CAS) इत्यादींसाठी खालीलप्रमाणे शोध निबंध ग्राह्य धरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ) UGC Approved List of Journals आणि UGC Care List अस्तित्वात येण्यापूर्वी ISSN क्रमांक असणाऱ्या सर्व संशोधन पत्रिकेतील शोध निबंध.

ब) बारकाईने पुनर्विलोकन केलेल्या (Peer Reviewed Journal) संशोधन पत्रिकेतील शोध निबंध. परंतु त्यासाठी सदरची प्रक्रिया Single blind review/Double blind review/Open or Transperent Peer Review पध्दतीने पूर्ण केल्याबाबतचे संबंधित संशोधन पत्रिका संपादकांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. उपरोक्त प्रक्रिया न करता संशोधन पत्रिकेच्या संपादकाने केवळ बारकाईने पुनर्विलोकित केलेले (Peer Review Journal) असे नमूद केले असेल तर ते ग्राहय धरण्यात येऊ नये.

क) वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या UGC Care List मध्ये Index केलेल्या संशोधन पत्रिकेत प्रसिध्द शोध निबंध.

सदरचे धोरण पुर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात येत असून यापूर्वी विहित संख्येएवढे शोध निबंध प्रसिध्द नसल्याच्या कारणास्तव नाकारण्यात आलेले कोणतेही प्रस्ताव या धोरणाप्रमाणे मान्य होत असल्यास अशा अर्जदारांस पुन्हा नव्याने प्रस्ताव सादर करावा लागेल.

मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था आणि मा. विभागप्रमुख, विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग यांना विनंती की, सदर परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

गणेशखिंड, पुणे — ४११००७ )
जा.क्र. :— सीबी/६१६ )
दिनांक :— १२/०८/२०२२ )

12/8/2022
(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

VOLUME - XII, ISSUE - II - DECEMBER - MAY - 2023-24
**ROYAL - ISSN 2278 - 8158 - IMPACT FACTOR - 6.701 (www.sjifactor.com)**

# २६. सातारा जिल्ह्यातील कृषीपूरक उद्योगधंदे एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप

**प्रा. अरूण सदाशिव कटकोळे**
संशोधक इतिहास विभाग प्रमुख, दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी.

**प्रस्तावना**

कृषी हा सातारा जिल्ह्याचा प्रमुख व्यवसाय आहे. अजून एकूण लोकसंख्येपैकी 70 टक्के लोकसंख्या शेतीवर आपली उपजीविका करते. प्राचीन काळापासून आधुनिक कालखंडापर्यंतचा इतिहास पाहता सातारा जिल्ह्याने सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रामध्ये आपल्या कार्यकतृत्वाने एक वेगळा ठसा उमटवला आहे. जिल्ह्यातील कृषी हा प्रमुख व्यवसाय असला तरी जिल्ह्यातील शेतकरी कृषीला पूरक असे अनेक व्यवसाय करतात. जिल्ह्यातील बहुतांश शेती मान्सूनवरच अवलंबून आहे. त्यामुळे अनेक वेळेला शेतक-यांना पूर, दुष्काळ, भूकंप यासारख्या नैसर्गिक आपत्तींना सामौर्य जावे लागते. अशावेळी केवळ शेतीवर अवलंबून राहणे शक्य नसते. तसेच शेतीमध्ये जो कच्चा माल तयार होतो त्याचे पक्क्या मालात रूपांतर करणेही गरजेचे असते. त्यामुळे अनेक कृषीपूरक उद्योगधंदे निर्माण होतात. जिल्ह्यात गुळ उद्योग आणि कापड उद्योग हे फार प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेले कृषीपूरक उद्योगधंदे आहेत. त्यामध्ये स्वातंत्र्योत्तर काळात भर पडून दुग्ध व्यवसाय, साखर उद्योग, रेशीम उद्योग मत्स्य उद्योग इत्यादी कृषीपूरक उद्योगधंदे वाढीस लागले आहेत. परिणामी या कृषीपूरक उद्योगधंद्यामुळेच जिल्ह्याला आर्थिक सुबत्ता प्राप्त झाली आहे.

**भौगोलिक परिस्थिती**

सातारा जिल्हा महाराष्ट्राच्या पश्चिम भागात असून पुणे, रायगड, रत्नागिरी, सोलापूर हे शेजारील जिल्हे आहेत. सातारा जिल्ह्याच्या उत्तरेस पुणे जिल्हा, पूर्वेस सोलापूर जिल्हा, दक्षिणेस व आग्नेयस सांगली जिल्हा, पश्चिमेस रत्नागिरी जिल्हा, वायव्येस (उत्तर-पश्चिमेस) रायगड जिल्हा आहे. जिल्ह्याचा विस्तार उत्तरेला $17^0$.50 ते $18^0$ 11' उत्तर अक्षांश आणि $73^0$ 33' ते $74^0$ 54' पूर्व रेखांश आहे."[1]

**नद्या**

जिल्ह्यात प्रामुख्याने नीरा, माणगंगा, येरळा आणि कृष्णा अशा चार नद्यांची खोरी असून या नद्यांना अनेक उपनद्या लाभलेल्या आहेत. त्यामध्ये कुडाळी, वेण्णा, उरमोडी, तारळी, कोयना, वसना इत्यादी नद्यांचा समावेश होतो."[2]

**हवामान आणि पर्जन्यमान**

उन्हाळ्यामध्ये पश्चिम विभागातील हवामान थंड आणि आल्हादायक असते. वाई तालुक्याच्या सपाटीवर मात्र वर्षभर समशीतोष्ण हवामान असते. जिल्ह्याच्या मध्यभागी उन्हाळ्यात उष्ण हवामान असते व हिवाळ्यात् दिवस उबदार व रात्री थंड

हवामान असते. पश्चिम व मध्य भागापेक्षा जिल्ह्याच्या पूर्व भागातील हवामान अधिक उष्ण आहे. ऋतुमानानुसार तेथील हवामानातही तफावत आढळून येते.

हवामानाप्रमाणे जिल्ह्याच्या पर्जन्यमानातही तफावत जाणवते. दुष्काळी तालुक्यातील सरासरी वार्षिक पर्जन्यमान फलटण 382 मि.मी., खटाव व खंडाळा 415 मि.मी., माण 443 मि.मी. इतके कमी आहे तर महाबळेश्वर तालुक्यात सरासरी वार्षिक पर्जन्यमान 2233 मि.मी इतके जास्त आहे. सह्याद्री पर्वत श्रेणीमध्ये पश्चिम भागातील टोकास सरासरी पर्जन्यमान 3000 मि.मी पेक्षा जास्त आहे. तर जिल्ह्याच्या मध्य व दक्षिण भागात ते 600 ते 900 मि.मी. इतके कमी आहे. पूर्व भागात सरासरी पर्जन्यमान 918.1 मि.मी इतके आहे."[3]

**जमीन**

जिल्ह्यात मगदुरानुसार 1. मध्यम काळी 2. हलकी किंवा मुरमाड 3. लॅटेराईट तांबड माती अशा तीन प्रकारची जमीन आढळून येते."[4]

**लोकसंख्या आणि क्षेत्रफळ**

सन 2011 च्या जनगणनेनुसार सातारा जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 30,03,741 इतकी आहे. यामध्ये स्त्रियांची संख्या 14,92,899 (49.70 टक्के) इतकी तर पुरूषांची संख्या 15,10,843 (50.30 टक्के) इतकी आहे. जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ 10 हजार 484 चौ.कि.मी. असून राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या 3.41 टक्के क्षेत्र जिल्ह्याच्या वाट्याला आले आहे. आकारमानाच्या दृष्टिने राज्यातील एकणू 36 जिल्ह्यांमध्ये या जिल्ह्याचा 12 वा क्रमांक लागतो. सातारा जिल्ह्यामध्ये एकूण 11 तालुके असून त्यामध्ये सातारा, कराड, महाबळेश्वर, वाई, जावळी, फलटण, माण, खटाव, कोरेगाव, खंडाळा या तालुक्यांचा समावेश होतो."[5]

**स्वातंत्र्यपूर्व काळातील कृषीपूरक उद्योगधंदे**

स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक कृषि-पूरक उद्योगधंदे विकसित झाल्याचे आढळून येते. 1906-07 मध्ये धातूपासून निरनिराळ्या वस्तू तयार करण्याचा व 1909 मध्ये कराडला आगपेटी तयार करण्याचा कारखाना सुरू झालेला होता. 1911-12 मध्ये जिल्ह्यात काही तेल गिरण्या होत्या. किर्लोस्करवाडीच्या कारखान्यात 1913-14 मध्ये 500 नांगराचे उत्पन्न झाल्याचे दिसून येते. 1922 मध्ये सातारा रोडला कूपर इंजिनियरिंग हा शेतीची अवजारे तयार करणारा कारखाना सुरू झाला. इ.स. 1928 मध्ये कराडला भुईमुग फोडण्याचा कारखाना सुरू झाला. 1929 मध्ये सातारा व कराडला रेशीम कारखाने सुरू झाले. 1933 मध्ये साखरवाडीस फलटण शुगर वर्क्स हा जिल्ह्यातील पहिला साखर कारखाना सुरू झाला. 1954 मध्ये फलटणमध्ये श्रीराम सहकारी साखर कारखाना व कराडला हळद कारखाना सुरू झाला. तर 1955 मध्ये रेठरे बुद्रुक कृष्णा सहकारी साखर कारखाना सुरू झाला.

अशाप्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक कृषीपूरक उद्योगांचे बीजारोपण होऊन स्वातंत्र्योत्तर काळात ते विकसित झाले."[6]

**स्वातंत्र्योत्तर काळातील कृषीपूरक उद्योगधंदे**

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये जिल्ह्यातील पोषक हवामान, सुपीक जमीन आणि शासनाने निरनिराळ्या उपलब्ध करून दिलेल्या शेतीविषयक सुविधा यामुळे कृषी उत्पादनात प्रचंड वाढ झाली. परिणामी वाढत्या कृषी उत्पादनासाठी कृषीपूरक उद्योगधंद्यांची गरज भासू लागली. त्यामुळेच अनेक कृषीपूरक उद्योगधंद्यांचा विकास घडून आला. जिल्ह्यात विकसित झालेले कृषीपूरक उद्योगधंदे पुढीलप्रमाणे

**1. पशुपालन व दुग्ध व्यवसाय**

पूर्वीच्या काळी जनावरे हा शेतीचा मुख्य प्रमुख आधार समजला जात असे. शेतक-यांकडे असलेली जमीन आणि जनावरांची संख्या यावरच शेतक-याची प्रतिष्ठा अवलंबून होती. त्यावेळी शेतीची जवळ-जवळ सर्वच कामे जनावरे करीत. परिणामी

शेतीच्या कामास उपयोगी जनावरांच्या पेदाशीसाठी गायी व म्हैशी ही मोठ्या प्रमाणात सांभाळल्या जात."[7]

पशुधनामध्ये गाय, बैल, म्हैस, घोडा, गाढव, रेडे, शेळ्या, मेंढ्या आणि उंट इत्यादी प्राण्यांचा समावेश होतो. या प्राण्यांचा उपयोग मालगाडी ओढण्यासाठी, आंतर मशागत तसेच दुध व शेण, मूत्रापासून कसदार खत यासाठी कृषी व्यवसायात जनावरांचे स्थान अनन्यसाधारण आहे."[8] जिल्ह्यातील आकडेवारी पुढीलप्रमाणे

**पशुगणनेनुसार जिल्ह्यातील पशुधन**

**पशुगणना व संस्था**

| अ.क्र | बाब | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **1992** | **1997** | **2003** | **2007** |
| | | | **गाय आणि बैल** | | |
| 1. | 2 ते $2\frac{1}{2}$ वर्षावरील बैल | 1,55,409 | 1,39,704 | 1,27,524 | 96,898 |
| 2. | 2 ते $2\frac{1}{2}$ वर्षावरील गायी | 1,78,683 | 1,81,408 | 1,35,536 | 2,19,827 |
| 3. | वासरे | 1,20,163 | 1,43,477 | 1,05,279 | 99,214 |
| | **एकूण :** | **4,45,255** | **4,64,598** | **3,68,339** | **4,15,939** |
| | | | **म्हैशी** | | |
| 1. | 3 वर्षावरील रेडे | 5328 | 4014 | 3327 | 2297 |
| 2. | 3 वर्षावरील म्हैशी | 2,03,608 | 2,26,843 | 3,14,401 | 2,21,251 |
| 3. | वासरे/ रेडके | 1,05,483 | 52,669 | 90,534 | 1,23,607 |
| | **एकूण :** | **3,14,419** | **2,83,526** | **4,08,262** | **3,47,155** |
| क | मेंढ्या | 369735 | 366807 | 437302 | 311623 |
| ड | शेळ्या | 377256 | 433013 | 401750 | 391173 |
| ई | घोडे | 1895 | 1911 | 2165 | 1725 |
| उ | इतर पशुधन | 97751 | 118292 | 126143 | 1040314 |
| ऊ | कोंबड्या, बदके इ. | 192666554 | 2010340 | 2226832 | 1507090 |
| | एकूण : | 35,41,865 | 36,78,478 | 39,70,793 | 30,79,019 |

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सन 1992 ते 2007 या कालावधीत एकूणच पशुधनाच्या संख्येत चढ-उतारपणा झालेला आढळतो. सन 1992 मध्ये बैल व गायींची एकूण संख्या 4,45,255 इतकी होती, 1997 मध्ये त्यामध्ये वाढ होऊन ही संख्या 4,64,589 इतकी झाली तर 2003 मध्ये त्यामध्ये घट होऊन ही संख्या 3,68,339 इतकी झाली. तर 2007 मध्ये परत त्यामध्ये वाढ होऊन ही संख्या 4,15,939 इतकी झाली.

तसेच म्हशी व रेडे यांची संख्या 1992 मध्ये 3,14,499 इतकी होती, 1997 मध्ये त्यामध्ये घट होऊन ही संख्या 2,83,526 इतकी झाली. 2003 मध्ये त्यामध्ये परत वाढ होऊन ही संख्या 4,08,262 इतकी झाली तर 2007 मध्ये त्यामध्ये पुन्हा घट होऊन ही संख्या 3,47,155 इतकी झाली. तर 1992 ते 2007 या काळातील एकूण पशुधन पाहता असे दिसते की, 1992 पासून 2003 पर्यंत अनुक्रमे पशुधनाच्या संख्येत वाढ जाणवते. कारण 1992 मध्ये एकूण पशुधनाची संख्या अनुक्रमे 3541865, 1997 मध्ये 3678478 आणि 2003 मध्ये 3970793 इतकी वाढलेली आहे पण 2007 मध्ये या संख्येत घट होऊन ही संख्या 3079019 इतकी झाली आहे.

**गायी-बैल**

जिल्ह्यात स्थानिक आणि संकरित गायी आढळून येतात. यामध्ये स्थानिक जातीच्या गायींची संख्या अधिक आढळून येते. संकरित गायीत जर्सी, रेड, ट्रेन, होलस्टेन, फिजीयन जातीच्या गायी आढळतात.

जिल्ह्यात खिलार बैलांची जात प्रसिद्ध असून माण व खटाव तालुक्यात खिलार जातीच्या बैलांची पैदास मोठ्या प्रमाणावर होते. जिल्ह्याच्या पश्चिम भागात डांगी बैलांच्या जातीचा वापर करतात. अलीकडे काही ठिकाणी एच.एफ. व जर्सी क्रॉस जातीचे बैलही आढळून येतात.

**म्हैशींच्या जाती**

जिल्ह्यात कृष्णा व कोयना नद्यांच्या खो-यात पंढरपुरी या अधिक दूध देणा-या म्हैशींची संख्या जास्त असून काही ठिकाणी मेहसाणा व जाफराबादी म्हैशी आढळून येतात. शेळ्या-मेंढ्या मात्र सर्वत्र आढळतात.

**शेळी-मेंढी पालन**

शेळ्या-मेंढ्या पालनाचा व्यवसाय हा प्रामुख्याने धनगर समाजातून केला जात आहे. हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात खुल्या पद्धतीत केला जात आहे. तर फक्त दोनच ठिकाणी तो बंदिस्त स्वरूपात केला जात आहे. एक म्हणजे फलटण येथील लांबकर यांचे बंदिस्त शेळी पालन व शेळी-मेंढ्या पालन केंद्र वडजल या ठिकाणी फक्त बंदिस्त पद्धतीत शेळी व मेंढी पालन केले जाते. तर दुसरे ठिकाणी म्हणजे माण तालुक्यातील दहिवडी येथे अहिल्यादेवी होळकर शेळी-मेंढी पालन व संवर्धन केले जाते. फलटण, माण व खंडाळा या तीन तालुक्यांत धनगर समाज मोठ्या प्रमाणात आहे व त्यांचा मेंढपाळ हा मुख्य व्यवसाय आहे. तसेच काही शेतकरी ही शेळ्या-मेंढ्या पालनाचा व्यवसाय कृषीला जोडधंदा म्हणून करतात आणि त्यापासून त्यांना चांगले उत्पन्न मिळते."[9]

**जिल्हा परिषदेमार्फत पशु सुधारणेच्या योजना**

**दुग्ध व्यवसाय**

1955-56 पासून ग्रामीण भागातून संघटित दुग्ध व्यवसायाला सुरूवात झाली. सन 1958 मध्ये या व्यवसायाचे महत्त्व ओळखून दुग्ध व्यवसाय विकास सुरू केला. जिल्ह्यात पहिल्या शासकीय दुग्ध शाळेची स्थापना फेब्रुवारी 1966 मध्ये महाबळेश्वरला व पहिल्या शीत केंद्राची स्थापना सप्टेंबर 1980 मध्ये पारगावला (ता. खटाव) झाली.

**जिल्ह्यातील दूध उत्पादक संघ**

स्वातंत्र्योत्तर काळात जिल्ह्यात अनेक दूध उत्पादक संघ निर्माण झाले. ते पुढीलप्रमाणे-

**कोयना सहकारी दूध उत्पादक संघ**

सन 1957 मध्ये कराड येथे कोयना सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ हा पहिला दूध संघ स्थापन झाला. सहकार तत्वावर स्थापन झालेला हा संघ दिवंगत आर.डी. पाटील यांनी स्थापन केला. तर त्यानंतर माजी सहकार मंत्री विकास काका उंडाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली या संघाची प्रगती होत गेली. संपूर्ण सातारा जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या कोयना संघाकडे गाय व म्हैशीच्या दुधाचे प्रति दिन 80 हजार लिटरहून अधिक संकलन होते.

कोयना दूध संघाकडे होणा-या संकलित दुधापैकी 65 टक्के दुधाची विक्री होते. 10 टक्के दूध उपपदार्थ निर्मितीसाठी वापरले जाते आणि उर्वरित 25 टक्के दूध बल्क सेलसाठी पाठविण्यात येते. सातारच्या कंदी पेढ्यानंतर कोयनेचे पेढे प्रसिद्ध आहेत. कोयना दूध संघ प्रतिदिन 500 किलो पेढ्याचे उत्पादन घेतो. कोयना दूध संघ सातारा जिल्ह्याबरोबरच महाराष्ट्रातील मुंबई, पुणे या सारख्या शहरांना दुग्ध पुरवठा करतो."[10] कोयना दूध संघाबरोबरच अजिंक्य सहकारी दूध पुरवठा संघ सातारा (1944), कृष्णा व्हॅली दूध पुरवठा संघ वाई (1973), जावळी तालुका सहकारी दूध पुरवठा संघ, फलटण (डिसें. 1976), खंडाळा तालुका सहकारी दूध पुरवठा संघ, कर्नवडी-शिरवळ (सप्टें. 1977) कोरेगाव तालुका सह दूध पुरवठा संघ, कर्नवडी शिरवळ (फेब्रु. 1986) इत्यादी दूध संघानी दुग्ध व्यवसायात महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे."[11]

**दूध विकास विस्तार योजना**

दुग्ध व्यवसाय विकासासाठी 1978 पासून दूध विकास विस्ताराचा कार्यक्रम स्वतंत्ररित्या जिल्हा दुग्ध विकास अधिका-यांच्या अधिकाराखाली राबविला जात आहे. या योजनेमार्फत अल्प भूधारक व मागासवर्गीयांना म्हैशी व म्हैशींची पारडे वाजवी किंमतीत पुरवितात.

**साखर उद्योग**

सन 1948 मध्ये महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यात प्रवरानगर येथे पहिला सहकारी साखर कारखाना निर्माण झाला. 1950 नंतर राज्य सरकारने ऊस उत्पादनाला चालना दिल्यामुळे सहकारी तत्वावर अनेक साखर कारखाने उदयास आले. त्यामध्ये

अनेक जिल्ह्यांमध्ये साखर कारखान्यांचा जो पाया घातला त्यामध्ये कोल्हापूर, सांगली जिल्ह्यासह सातारा जिल्हाही अग्रभागी होता."[12]

**सातारा जिल्ह्यातील साखर उद्योगाचा विकास**

जिल्ह्यातील साखर उद्योग हा प्रमुख असून जिल्ह्यातील संपूर्ण अर्थव्यवस्था ही साखर उद्योगावरच अवलंबून आहे. त्यामुळेच जिल्ह्यात 2010 पर्यंत एकूण 11 साखर कारखाने निर्माण झाले.

1. **फलटण शुगर वर्क्स लि.**
2. **श्रीराम सहकारी साखर कारखाना (फलटण)**
3. **कृष्णा सहकारी साखर कारखाना (रेठरे बुद्रुक)**
4. **किसनवीर सहकारी साखर कारखाना (भुईंज)**
5. **बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखाना (मरळी)**
6. **सह्याद्री सहकारी साखर कारखाना (शिरवडी कराड)**
7. **अजिंक्यतारा सह. साखर कारखाना**
8. **जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना चिमन**
9. **किसनवीर साखर कारखाना**

- **गुळ उद्योग**
- **मूल्यामापन**

जिल्ह्याच्या कृषी व्यवसायाबरोबरच जिल्ह्यात निर्माण झालेल्या कृषी-पूरक उद्योगधंद्यामुळे जिल्ह्याचा आर्थिक विकास घडून आला आहे. जिल्ह्यात पशुपालन, दुग्ध व्यवसाय, साखर उद्योग, गुळ, खाद्य तेल उद्योग, कुक्कुटपालन, मत्स्य व्यवसाय, रेशीम व्यवसाय, रेशीम उद्योग या व्यवसायांना लागणारा कच्चा माल जिल्ह्यातील शेतीतूनच मिळत असल्यामुळे या कृषीपूरक उद्योगधंद्याचा मोठ्या प्रमाणात विकास घडून आला आहे. त्याचबरोबर शासकीय पातळीवरही मोठ्या प्रमाणात अनुदान मिळत असल्यामुळे कृषीपूरक उद्योगधंद्यांच्या वाढीस चालना मिळून जिल्ह्यातील शेतकरी सधन बनला आहे.

कृषीपूरक उद्योगधंद्यांमुळे वरील सकारात्मक बाजू दिसत असल्या तरी काही बाबतीत नकारात्मक परिणाम घडून आल्याचेही आढळून येते. कारण नवीन उद्योगधंद्यामुळे जुने उद्योगधंदे मोडीत निघाले आहेत. उदा. गुळ उद्योग प्राचीन असूनही साखर उद्योगामुळे हा उद्योग मागे पडला आहे. तसेच वाढत्या साखर उद्योगामुळे आरोग्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. वाढत्या कारखानदारीमुळे प्रदूषणही वाढले आहे. तसेच तरूणांचा ओढा शहराकडे वाढला आहे. आर्थिक विकास दिसत असला तरी काही तालुक उदा. माण, खटाव, फलटण हे तालुके विकासापासून वंचित राहिलेले दिसून येतात.

**शिफारशी**

1. पशुपालन आणि दुग्ध व्यवसाय हा जिल्ह्यातील शेतक-यांचा महत्त्वपूर्ण कृषीपूरक उद्योग आहे. परंतु या उद्योगाला शासकीय पातळीवर योग्य ते अनुदान मिळत नाही. या उद्योगाकडे शासनाने जाणीवपूर्वक लक्ष दिल्यास या उद्योगाचा निश्चितच विकास होईल.
2. सहकार मोठ्या प्रमाणात साखर उद्योगाला प्रोत्साहन देते. त्यामुळे साखर कारखानदारी फोफावली आहे. त्याचा परिणाम पारंपारिक गुळ उद्योगवर होऊन गुळ उद्योग मागे पडला आहे. गुळ उद्योगालाही साखर उद्योगाप्रमाणे प्रोत्साहन आणि अनुदान मिळाल्यास याही उद्योगाचा विकास होण्यास मदत होईल.
3. राजकीय दृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेल्या उद्योगांनाच शासन चालना आणि अनुदान देते. परंतु ही चालना कुटीर उद्योगांना दिल्यास त्याचा फायदा शेतकरी आणि सामान्य माणसांना होऊन समाजाचा महत्त्वाचा घटक असणा-या शेतकरी आणि सामान्य माणसाचीही आर्थिक परिस्थिती सुधारेल.

**संदर्भ**

1. Https://Marathime.Com-Sataradistrict
2. पाठक अरूणचंद्र (संपादक) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सातारा जिल्हा, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, 2012, पृ.11
3. जि.सा.आ. समालोचन, सातारा जिल्हा, 2016-17, पृ.02
4. पाठक अरूणचंद्र, उपरोक्त, पृ.338
5. HTTPS://MARATHIME.COM-SATARA-DIARICT
6. पाठक अरूणचंद्र, उपरोक्त, पृ.409-410
7. फराज गनी, भारत स्वातंत्र्य आणि विकास, प्रकाशन जिल्हा मध्यवर्ती बँक, कोल्हापूर, पृ. 224
8. पाठक अरूणचंद्र, उपरोक्त, पृ. 360
9. प्रत्यक्ष पाहणीवरून.
10. https://www.etvbharat.com-satara
11. पाठक अरूणचंद्र, उपरोक्त, पृ.363
12. Jadhav K.D., Socio-Economic Impact of suger Co-operation in Satara District, Ph.D Thesis (unpublished), Shivaji University, Kolhapur, P. No. 15
13. पाठक अरूणचंद्र, उपरोक्त, पृ.417